Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

mig
MIG INVESTMENTS

# वळू : निखळ मनोरंजन

26 Jan 2008, 0002 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

- मनीषा नित्सुरे

देवाच्या नावाने सोडलेला बैल म्हणजे वळू अशी श्रद्धा असलेल्या कुसवडे गावातला वळू सगळयांचा लाडका असतो. पण एक दिवस अचानक गावात वेड्या-वाकड्या घटना घडायला लाग
आणि वळू माजल्याची गावकऱ्यांची खात्री पटते. वळूला पकडण्यासाठी गावकरी सर्वतोपरी प्रयत्न करतात पण बैलापुढे सगळे हतबल होतात. वळू कधी भर वस्तीत शिरतो तर कधी देव
गावात घडणाऱ्या प्रत्येक बऱ्या-वाईट गोष्टीसाठी वळूलाच जबाबदार धरलं जातं. गावातील काही लोक वळूच्या नावावर आपली पोळी भाजून घेऊ लागतात.

गावातील सगळयात ज्येष्ठ व्यक्ती आजा (चंदकांत गोखले), सखुबाई (ज्योती सुभाष) आणि वेडी जानी (स्वाती उपाध्ये) या तीन व्यक्ती वगळता सगळं गाव वळूच्या विरोधात उभं ठाकतं.
मारण्याच्या हालचाली सुरू होतात, त्यावेळी याच तीन व्यक्ती त्याला विरोध करतात. मात्र दरम्यानच्या काळात आजाचा शेतात संशयास्पद मृत्यू होतो आणि त्याच्या मृतदेहाजवळ वळ्
सापडतो. या घटनेने गावकरी प्रचंड अस्वस्थ होतात. गावातील सरपंच (डॉ. मोहन आगाशे) पुढे सरसावतात आणि वळू माजल्याची बातमी थेट आमदारापर्यंत पोहोचवतात. त्याचवेळी
सरपंचांच्या विरोधात कारस्थानं रचणारा आबा (नंदू माधव) वळूला पकडण्याचा विडा उचलतो. वनविभाग वळूला पकडण्यासाठी एका फॉरेस्ट ऑफिसरची पाठवणी करतात. उच्चशिक्षि
शहरात राहणारा, आपल्या पदाचा प्रचंड अभिमान असलेला जिगरबाज फॉरेस्ट ऑफिसर स्वानंद गडुमवार (अतुल कुलकणीर्) कुसवडे गावात येऊन पोहोचतो. एका अत्यंत महत्त्वाच्या
सुनावणी सोडून स्वानंदला बैल पकडण्याच्या कामी पाठवलं गेल्याने तो प्रचंड नाराज असतो. स्वानंदबरोबर खेड्यातील जीवनावर डॉक्युमेंट्री करण्यास उत्सुक असलेला त्याचा भाऊ सर्म
(वृषसेन दाभोळकर) हाही येतो. गावात फॉरेस्ट ऑफिसर आणि त्याच्याबरोबर शूटिंगवाले आले आहेत हे कळताच गावात एकच उत्साहाचं वातावरण निर्माण होतं.

काहीशा नाराजीने आलेला ऑफिसर गावात कसा रूळतो ? गावकऱ्यांशी कसा वागतो? वळूला पकडण्यासाठी कशी फिल्डिंग लावतो? गावकरी त्याला कशी साथ देतात? गावकऱ्यांमधी
हेवेदावे फॉरेस्ट ऑफिसरसमोर कसे उघडे पडतात? सरपंचांचे विरोधक कशी कारस्थानं रचतात, हुशार फॉरेस्ट ऑफिसर यातून कसा मार्ग काढतो आणि शेवटी वळूला कसा पकडतो, हे
पाहण्यासाठी 'वळू' पाहायलाच हवा. गावरान वातावरणात घडणारं हे कथानक अगदी सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत विनोदाच्या विविध अंगाने उलगडत जातं. प्रत्येक सीनमधून विनोदा
निमिर्ती होते. प्रत्येक पात्राची एन्ट्री कथानकाच्या गरजेनुसार अगदी सहज होते आणि त्यानंतर मात्र सगळी पात्रं धमाल उडवून देतात. निर्माण होणारे विनोद उत्स्फूर्त वाटतात. फॉरेस्ट
शहरी शहाणपण आणि गावकऱ्यांचं खेड्यातील तत्त्वज्ञान यांची सुरेख सांगड घातली आहे. सिनेमातील तांत्रिक बाजूही पडद्यामागच्या कलाकारांनी यशस्वीपणे सांभाळली आहे.

फॉरेस्ट ऑफिसरची भूमिका अतुल कुलकणीर्ने चांगली पेलली आहे. या फॉरेस्ट ऑफिसरचा गावातील मदतनीस म्हणून गिरीश कुलकणीर् याने जीवनच्या भूमिकेत जीव ओतला आहे. पंड
त्याची बायको (दिलीप प्रभावळकर-निमिर्ती सावंत), सरपंच व त्याची बायको (डॉ. मोहन आगाशे-भारती आचरेकर), सांगी आणि तानी (अमृता सुभाष-वीणा जामकर), सखुबाई-सुरेश

आणि तानीची आई (ज्योती सुभाष, अश्विनी गिरी आणि मेघना वैद्य), सत्या आणि आबा (सतीश तारे आणि नंदू माधव) या सगळ्या जोड्यांनी चित्रपटात आपापल्या भूमिका चोख बजा
आहेत. सिनेमातील काही छोट्या घटनांचा संदर्भ सिनेमाच्या शेवटी सुटल्यासारखा वाटतो. पण कोणत्याही जगावेगळ्या तत्त्वज्ञानात न अडकता कथावस्तू त्यातील भाबडा गावरान टच सहज पुढे सरकत जाते आणि प्रेक्षकांना निखळ मनोरंजनाचा आनंद देते.

...............

निर्माते : उमेश कुलकणीर्, गिरीश कुलकणीर्, गणपत कोठारी आणि प्रशांत पेठे, दिग्दर्शक : उमेश कुलकणीर्, कथा-पटकथा : उमेश कुलकणीर्, गिरीश कुलकणीर्.कलाकार: अतुल कुलक
माधव, डॉ. मोहन आगाशे, भारती आचरेकर, निमिर्ती सावंत, ज्योती सुभाष, अमृता सुभाष, गिरीश कुलकणीर्, वीणा जामकर, रेणुका दफ्तरदार, सतीश तारे आणि चंदकांत गोखले.दज

About Us | Advertise with Us | Careers @ TIL | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright □ 2008 Times Internet Limited. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768